पहिली भारत-कॅनडा स्थलांतर आणि गमनशीलता संवाद बैठक

भारत आणि कॅनडा यांच्यातील भारत-कॅनडा स्थलांतर आणि गमनशीलता संवादाची पहिली बैठक आज नवी दिल्ली येथे पार पडली. या बैठकीचे सह-अध्यक्षपद सुश्री श्रीप्रिया रंगनाथन, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सचिव (सीपीव्ही आणि ओआयए) आणि कॅनडाच्या 'इमिग्रेशन, रेफ्युजीज अँड सिटिझनशिप'चे (आयआरसीसी) उपमंत्री श्री टेड गॅलिव्हन यांनी भूषवले. दोन्ही शिष्टमंडळांमध्ये उभय देशांच्या संबंधित मंत्रालये आणि यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

2. दोन्ही देशांमधील लोक हाच भारत आणि कॅनडातील सर्वात मजबूत दुवा आहे, या सामायिक विश्वासाचा पुनरुच्चार करत उभय बाजूंनी या संवादाच्या 'कार्यकक्षेसंदर्भातील नियमांवर' स्वाक्षरी केली. भारताचे तरुण व कुशल मनुष्यबळ आणि कॅनडातील लोकसंख्याशास्त्रीय व कामगार बाजारातील ट्रेंड यांच्यात नैसर्गिक पूरकता आहे, ज्यामुळे सुनियोजित आणि योग्य व्यवस्थापन केलेली गमनशीलता ही काळाची गरज बनली आहे. हा संवाद दरवर्षी आयोजित केला जाईल आणि त्यासाठी 'स्थलांतर आणि गमनशीलतेवरील संयुक्त कार्यगट' सहाय्य करेल.

3. या बैठकीतील चर्चा प्रामुख्याने विद्यार्थी, कुशल कामगार, व्यावसायिक आणि व्यावसायिक अभ्यागतांची गमनशीलता तसेच स्थलांतर व्यवस्थापनातील सहकार्यावर केंद्रित होती.

4. या संवादाची पुढील बैठक परस्पर सोयीच्या तारखांना कॅनडामध्ये आयोजित करण्याचे दोन्ही बाजूंनी मान्य केले.

नवी दिल्ली

26 ऑक्टोबर 2026